**गिरणी कामगारांना बृहन्मुंबईमध्ये उपलब्ध करुन द्यावयाच्या घरांबाबत अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : बैठक-२०२५/प्र.क्र.५५/गृनिधो-२**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ मे, २०२६.

वाचा :-

शासन निर्णय क्र. गिकाघ २०२३/प्र.क्र.१२८/गृनिधो-२, दि. १५ मार्च, २०२४

**प्रस्तावना:-**

सन १९८२ च्या संपामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५८ आजारी/बंद पडलेल्या कापड गिरण्यांमधील पात्र गिरणी कामगार / त्यांच्या वारसांना मुंबई महानगर क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत वाचा येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

मा.उप मुख्यमंत्री महोदय (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३.०३.२०२६ रोजी गिरणी कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत गिरणी कामगार संघटना व लोकप्रतिनिधी समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री यांनी गिरणी कामगारांच्या मागणीनुसार बृहन्मुंबईमध्ये घरे उपलब्ध करून देण्याबाबतचे विविध पर्याय तपासण्याचे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशानुसार गिरणी कामगारांना बृहन्मुंबईमध्ये घरे उपलब्ध करुन देण्याबाबतच्या पर्यायांची तपासणी करण्याकरीता अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

मा.उप मुख्यमंत्री महोदय (गृहनिर्माण) यांनी दिनांक १३.०३.२०२६ रोजी गिरणी कामगारांच्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार गिरणी कामगारांना बृहन्मुंबईमध्ये घरे उपलब्ध करुन देण्याबाबतच्या पर्यायांची तपासणी करण्याकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (गृहनिर्माण) | अध्यक्ष |
| २) | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नगर विकास-१) | सदस्य |
| ३) | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त विभाग/व्यय) | सदस्य |
| ४) | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कामगार) | सदस्य |
| ५) | उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, | सदस्य |
| ६) | मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई | सदस्य सचिव |

मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई तथा सदस्य सचिव यांनी दिनांक १३.०३.२०२६ बैठकीच्या इतिवृत्तानुसार गिरणी कामगारांना बृहन्मुंबईमध्ये घरे उपलब्ध करुन देण्याबाबतच्या विविध पर्यायास अनुसरुन आवश्यक प्रस्ताव समिती समोर सादर करण्याची कार्यवाही करावी. सदर समितीने वेळोवेळी बैठकांचे आयोजन करुन सदर प्रकरणी परिपूर्ण अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५१८१३१५४०२८०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PHIRANGE NITIN RAGHUNATH

Digitally signed by PHIRANGE NITIN RAGHUNATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT, 2.5.4.20=edb67d4776bf9bdb10539891848bf113937cdf1adfca7bf1e9cac22215940c14, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2B60EEA8BE04A132B62B97355616E6FF0326DC7DC810ECA40666D631BE1ACA07, cn=PHIRANGE NITIN RAGHUNATH
Date: 2026.05.18 13:16:53 +05'30'

**( नितीन फिरंगे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (नगर विकास विभाग-१) मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (कामगार विभाग) मंत्रालय, मुंबई.
६. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई - ५१.
७. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई.
८. मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (गृनिधो-२).